—: प्रेसनोट :—                                   दि. २५/०२/२०२२

यातील फिर्यादी यांची शेत जमीन रेल्वेमार्गासाठी शासनाने संपादित केली आहे. सदर भुसंपादित जमीनीचा मोबदला देण्यासाठी यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादी यांचेकडे रु. ८,००,०००/— रक्कमेची प्रत्यक्ष तसेच खाजगी इसम यांचेमार्फतीने मागणी करुन तडजोडीअंती रु. ६,००,०००/— लाचेची रक्कम त्रयस्थ खाजगी इसमामार्फत स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | शांतीनगर पोलीस ठाणे, गु.र.क्र. १०७/२०२२ |
| कलम | ७, ७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १. श्री. विठ्ठल गोसावी, वय ५४ (नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भिवंडी विभाग, भिवंडी<br>२. विजय भाईर उर्फ पिंट्या, वय २८ वर्षे (मध्यस्थ खाजगी एजंट) रा.भिवंडी<br>३. श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित, वय ५२ (सोनार), रा. भिवंडी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ८,००,०००/— |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ६,००,०००/— (रु. २ लाख रोख रक्कम व रु. ४ लाख चेक स्वरुपात) |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांची शहापुर येथील शेतजमीन, कल्याण कसारा ३रा रेल्वेमार्गाकरीता शासनाने संपादित केली आहे. भुसंपादित केलेल्या जमिनीची रु. ५५,००,०००/— नुकसान भरपाई शासनाचे वतीने उप विभागीय अधिकारी, ता. भिवंडी या कार्यालयाकडुन फिर्यादीस मिळणार आहे. याबाबत फिर्यादी यांनी नमुद कार्यालयात भुसंपादित जमीनीची नुकसान भरपाई मिळणेकरीता वेळोवेळी पाठपुरावा केला असता, यातील आरोपीत क्र.१ यांनी फिर्यादी यांचेकडे रु. ९,००,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना आरोपीत क्र. १ यास मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई येथील वरिष्ठ अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटुन लेखी तक्रार दिली. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्याकरीता वरिष्ठांकडुन ला.प्र.वि., मुंबई विभागास लेखी आदेश देण्यात आले.<br><br>त्याप्रमाणे दिनांक १६/०२/२०२२ रोजीच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १६, १८ व २२/०२/२०२२ रोजी आरोपीत क्र.१ यांचे कार्यालयात तसेच आरोपीत क्र. ०२ व ०३ यांचेकडे शासकिय पंचासमक्ष पडताळणी केली असता, आरोपीत क्र.१ यांनी मध्यस्थी इसम आरोपीत क्र.२ यांचेमार्फतीने फिर्यादी यांचेकडे प्रथम रु. ८,००,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी केली. तसेच तडजोडीअंती मध्यस्थी इसम आरोपीत क्र. ३ यांना रु. ६,००,०००/— घेण्यास सांगितले.<br><br>त्यावरुन दिनांक २४/०२/२०२२ रोजीच्या सापळा कारवाईदरम्यान आरोपीत क्र. ३ यांने फिर्यादी यांचेकडुन रु. ६,००,०००/— लाचेची रक्कम स्विकारल्याने रंगेहात पकडण्यात आले व लाचेची रक्कम स्विकारण्यास आरोपीत क्र. १ यांनी फोनवरुन सहमती दिल्याने वर नमुद आरोपीत क्र. १ व २ यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. यादरम्यान अटक आरोपीतांकडुन ४३ वेगवेगळया बँकांचे चेक्स (नाव नमुद नसलेले व सही केलेले) जप्त करण्यात आले. (चेकची एकुण रक्कम रु. २,३४,७३,१००/— इतकी आहे.<br><br>फिर्यादी यांनी वर नमुद आरोपीतांविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडुन शांतीनगर पोलीस ठाणे, ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

(संजय पाटील)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग,मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.
संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net. टोलफ्री. क्र. १०६४
दुरध्वनी क्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned with CamScann